दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १२५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.१७ डिसेंबर २०२४


अडचणीत असतांना अडचणीपासून दूर पळणे, म्हणजे अजून मोठ्या अडचणीत जाण्यासारखेच आहे.

अर्थ मराठी

## ९ वर्षांच्या मुलीचा विनयभंग करणाऱ्याला अटक

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, मुंबई :** निर्जनस्थळी नेऊन ९ वर्षीय मुलीसोबत अश्लील कृत्य करणाऱ्या ५५ वर्षीय व्यक्तीला पोलिसांनी रविवारी अटक केली. पीडित मुलीने आरडाओरडा केला असता आरोपीने तिला गळा दाबून ठार मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी आरोपीविरोधात विनयभंग व बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण कायदा (पोक्सो) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

पीडित मुलगी रविवारी तिच्या मैत्रिणीच्या घरी जात होती. त्यावेळी आरोपीने तिला पकडून शेजारी असलेल्या जंगल परिसरात नेले. आरोपीने तिच्यासोबत अश्लील कृत्य केले. त्यावेळी तिने आरडाओरडा केला असता आरोपीने तिला गळा दाबून ठार मारण्याची धमकी दिली. पीडित मुलगी घाबरली. तिने घडलेला प्रकार आईला सांगितला. आईने पोलिसात धाव घेऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी विनयभंग व पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला. त्यानंतर आरोपी राहत असलेल्या परिसरा शोध घेऊन त्याला ताब्यात घेण्यात आले. पोलीस ठाण्यात आणल्यानंतर त्याचा गुन्ह्यांत सहभाग निष्पन्न झाल्यानंतर पोलिसांनी त्याला याप्रकरणी अटक केली.

## शर्टाने केला घात ग्राईंडरमध्ये अडकून कामगाराचा मृत्यू

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, मुंबई :** वरळी कोळीवाड्याजवळील नरिमन भाट नगर येथे ग्राईंडरमध्ये अडकून कामगाराचा मृत्यू झाल्याप्रकरणी दादर पोलिसांनी मालक सचिन कोठेकर विरोधात गुन्हा दाखल केला. मृत कामगाराला ग्राईंडर चालवण्याचा कोणताही अनुभव नसताना त्यातून कच्चा माल काढण्यास सांगितले. त्यावेळी शर्ट अडकल्याम ुळे तो ग्राईंडरमध्ये खेचला गेला. याबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

मृत कामगाराचा चुलत भाऊ महेश यादव याच्या तक्रारीवरून याप्रकरणी दादर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, महेश यादव गेल्या पाच वर्षांपासून सचिन कोठेकर यांच्याकडे चायनीज खाद्यपदार्थांसाठी लागणारा कच्चा माल बनवण्याचे काम करीत होता. त्याच्यासोबत पाच जण तेथे काम करीत होते. चायनीज पकोडे बनवण्यासाठी पीठ मळणे, कोबी, फ्लॉवर बारीक करणे यासाठी नरिमन भाटनगर येथील अमर संदेश मंडळाजवळील एका खोलीमध्ये इलेक्ट्रीक ग्राईंडर ठेवला होता. गेल्या पाच वर्षांपासून यादवच ग्राईंडरवर काम करीत होता. आरोपी सचिन कोठेकरने शनिवारी कच्चा माल आणण्यासाठी सूरज यादवला पाठवले. बराच वेळ झाला तरी सूरज यादव परत आला नाही. चायनीज पकोड्याच्या गाडीवर कार्यरत असलेल्या सचिनला अखेर दूरध्वनी आला. दूरध्वनी करणाऱ्या व्यक्तीने सूरज ग्राईंडरमध्ये अडकल्याचे सांगितले. त्यामुळे सर्वनी घटनास्थळी धाव घेतली. सूरज ग्राईंडरमध्ये अडकला होता. त्याला ग्राईंडरमधून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. पण तो बाहेर निघाला नाही. अखेर अग्निशम नदलाच्या जवानांना पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाच्या जवानांनी सूरजला ग्राईंडरमधून बाहेर काढून रुग्णवाहिकेतून परळ येथील केईएम रुग्णालयात नेले. तेथे दाखल करण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले. सूरजला ग्राईंडर चालवण्याचा कोणताही अनुभव नसताना त्याला त्यातून कच्चा माल काढण्यास सांगितले. त्यामुळे सूरजचा मृत्यू झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. याप्रकरणी मालक सचिन कोठेकरविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून दादर पोलीस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

## तानाजी सावंत यांनी फेसबुकचा डीपी आणि कव्हर फोटो बदलला, शिवसेना नाव आणि चिन्हही हटवलं

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाचा विस्तार १५ डिसेंबरला नागपूरमध्ये पार पडला. या मंत्रिमंडळात जुन्या नव्या अशा ३९ चेहऱ्यांना स्थान देण्यात आलं आहे. लवकरच खातेवाटप होईल असंही सांगण्यात आलं आहे. मागच्या सरकारमध्ये मंत्री असलेल्या दीपक केसरकर, तानाजी सावंत आणि अब्दुल सत्तार यांचा पत्ता कट झाला आहे. भाजपामध्येही सुधीर मुनगंटीवार यांना स्थान देण्यात आलेलं नाही. यानंतर काहींची नाराजी समोर येते आहे. दरम्यान शिवसेना (एकनाथ शिंदे) नेते तानाजी सावंत यांनी फेसबुकचा डीपी बदलला आहे.

**तानाजी सावंत यांनी फेसबुकचा डीपी बदलला**

शिवसेना पक्षातील पहिल्या फळीतील नेते असलेल्या आमदार तानाजी सावंत यांना मंत्रिपदाची संधी न मिळाल्याने ते नाराज झाल्याची चर्चा आहे. राज्य सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तार शिवसेना शिंदे गटाच्या ११ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. त्यामध्ये, अनेक नव्या चेहऱ्यांना संधी मिळाली आहे. मात्र, शिवसेना पक्षातील वरिष्ठ नेते व शिंदे सरकारमधील तीन माजी मंत्र्यांना डच्चू देण्यात आला. त्यामध्ये, धाराशिव जिल्ह्यातील परंडा मतदारसंघाचे आमदार तानाजी सावंत यांनाही मंत्रीपद देण्यात आलेलं नाही. त्यामुळे, तानाजी सावंत  नाराज असून त्यांनी माध्यमांशी बोलण्याचंही टाळलं आहे. याबाबत, त्यांच्या कार्यालयाकडून माध्यमांसाठी पत्रकही जारी करण्यात आलं होतं. आता, तानाजी सावंत यांनी त्यांच्या फेसबुकचा प्रोफाईल फोटो बदलल्याने चर्चांना उधाण आलं आहे. विशेष म्हणजे तानाजी सावंत यांनी आपल्या प्रोफाईलमधील शिवसेना हे नाव काढलं आहे.

**तानाजी सावंत यांनी कव्हर फोटो आणि डीपी दोन्ही बदललं**

तानाजी सावंत यांनी त्यांच्या फेसबुकचा कव्हर फोटो आणि डीपी दोन्ही बदललं आहे. शिवसेनेचं नाव आणि चिन्ह असलेलं प्रोफाइल सावंत यांनी हटवलं आहे. त्याऐवजी, नवीन प्रोफाईल ठेवण्यात आलं असून या नव्या प्रोफाईल फोटोम ध्ये फक्त शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो दिसून येत आहे. तसेच, शिवसेना चिन्ह असलेल्या फोटोच्या जागी शिवसैनिक उल्लेख असलेला बाळासाहेबांचा फोटो असल्याचं पाहण्यास मिळतं आहे. तानाजी सावंत यांनी फ सबुकचा डीपी आणि कव्हर फोटो दोन्ही बदलल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

## महाराष्ट्रात गुलाबी थंडीची लाट ! नगरमध्ये थंडीचा कहर !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, मुंबई :** राज्यात सोमवारी (१६ डिसेंबर) नगर, पुणे, मालेगाव, नाशिक, संपूर्ण मराठवाडा आणि विदर्भातील गोंदिया, नागपूर आणि आकोल्यात थंडीची लाट पसरली होती. नगर येथे सर्वात कमी ५.५ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. बुधवारपासून (१८ डिसेंबर) किमान – कमाल तापम ानात एक ते दोन अंश सेल्सिअसने वाढ होण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी उत्तर महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र, आणि विदर्भातील काही ठिकाणी तर मराठवाड्यात बहुतेक ठिकाणी थंडीची लाट पसरली होती. नगरमध्ये सर्वात कमी ५.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. नगर खालोखाल पुण्यात ७.८, जळगावात ७.८, मालेगावात ९.६, मराठवाड्यातील धाराशिवमध्ये ९.४, छत्रपती औरंगाबादमध्ये ९.६, परभणीत ८.२, बीडमध्ये ७.५, विदर्भातील गोंदियात ७.४, नागपुरात



८.४, वर्ध्यात ९.४ आणि अकोल्यात ९.९ अंश सेल्सिअस किमान तापम ानाची नोंद झाली होती. वरील बहुतेक ठिकाणी थंडीच्या लाटेची किंवा थंडीची लाट सदृश्य स्थिती निर्माण झाली होती.

**लडाखमध्ये वजा १३.६ अंश सेल्सिअस...**

हिमालयीन रांगांसह उत्तर भारतात थंडीची लाट आहे. सोमवारी लडाखमध्ये वजा १३.६, शोपियान वजा ६.३, हिमाचल प्रदेशच्या स्पिती व्हॅलीत वजा ७.५, पंजाबमध्ये ०.६, हिस्सारमध्ये ०.६, दिल्लीत ४.० आणि अयोध्येत ३.० अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली आहे. मध्य प्रदेशपर्यंत थंडीची लाट सक्रीय आहे. त्यामुळे उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही ठिकाणी थंडीची लाट निर्माण झाली आहे.

**नगरमध्ये १९७० च्या डिसेंबरची पुनरावृत्ती**

नगरमध्ये २१ डिसेंबर २०१० मध्ये आजवरचे डिसेंबर महिन्यातील सर्वात कमी ३.२ अशं सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली होती. तर १ डिसेंबर १९७० रोजी ५.५ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली होती. सोमवारी नगरमध्ये १९७० मधील तापमानाची पुनरावृत्ती झाली आहे. नगरमध्ये ७ जानेवारी १९४५ रोजी आजवरचे सर्वात कमी २.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती.

**बुधवारपासून थंडी कमी होणार**


उत्तर भारतात थंडीची लाट आहे. उत्तरेकडून येणाऱ्या वाऱ्यामुळे थंडी राज्यापर्यंत पोहचत आहे. मंगळवारी (१७ डिसेंबर) पहाटे उत्तर महाराष्ट्र, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागात थंडीची लाट किंवा थंडीची लाट सदृश्य स्थिती असू शकेल. बुधवारपासून (१८ डिसेंबर) किमान तापमानात एक ते दोन अंश सेल्सिअसने वाढ होण्याचा अंदाज आहे. बुधवारपासून राज्यातील थंडी कमी होईल, अशी माहिती मुंबईस्थित हवामान विभागाच्या शास्त्रज्ञ डॉ. सुषमा नायर यांनी दिली.

## लाल कांदा दरात दीड हजारांची घसरण, कांदा उत्पादक शेतकरी चिंतेत...

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** देशांतर्गत बाजार समितीमध्ये नवीन लाल कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक होत असल्याने बाजारभावात घसरण सुरू आहे. शुक्रवारच्या तुलनेत रविवारी (दि.१५) दोन दिवसांत कमाल बाजारभावात १५०० रुपयांची, तर सरासरी बाजारभावात १ हजार रुपयांची मोठी घसरण झाल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे. पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीत लाल कांद्याची आवक दुपटीने वाढली आहे.

परिणामी, कांद्याची लाली एका आठवड्यात उतरली असून, भाव प्रतिक्विंटल हजार रुपयांनी कमी झाला



आहे. पारनेरसह अहिल्यानगर जिल्ह्यातील तसेच नाशिक, पुणे, चाकण, सोलापूर यांसह देशांतर्गत असलेल्या बाजार समि त्यांमध्ये मागणीच्या तुलनेत नव्याने येत असलेल्या लाल कांद्याची आवक अधिक आहे.

त्यामुळे शुक्रवार (दि.१३) च्या तुलनेत रविवारी (दि.१५) दोन दिवसांत टप्प्याटप्प्याने कमाल बाजारभावरात १,५०० तर सरासरी बाजारभावात १,००० रुपयांची घसरण झाली. सद्यस्थितीत लाल कांद्याला २५०० ते ३५०० रुपये प्रतिक्विंटल इतका भाव मिळत आहे. गेल्या आठवड्यात साडेतीन ते चार हजार रुपयांनी लाल कांद्याची विक्री सुरू होती. आवकही मर्यादित प्रमाणात असल्यामुळे कांद्याचे दर टिकून होते. एका आठवड्यात लाल कांद्याची आवक दुपटीने वाढली आहे. लाल कांद्याची साठवण क्षमता फार कमी असते. त्यामुळे काढणीनंतर लगेच शेतकरी कांदा बाजार समितीत विक्रीसाठी बाजारात आणत आहेत.


पारनेर कृषी बाजार समितीत ४९८७९ कांद्या गोण्यांची आवक होऊन पाच वक्कला लाल कांद्याला ३५०० ते ३७०० चा बाजारभाव मिळाला. १ नंबर कांद्याला ३२०० ते ३४०० २ नंबर कांद्याला २५०० ते ३४०० ३ नंबर कांद्याला १६०० ते २४०० ४ नंबर कांद्याला ५०० ते १५०० सरासरी प्रतिक्विंटल भाव मिळाला. अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तसेच पुणे,चाकण नाशिक, सोलापूर यांसह देशांतर्गत असलेल्या बाजार समितीत्यांमध्ये मागणीच्या तुलनेत नव्याने येत असलेल्या लाल कांद्याची आवक मोठ्या प्रमाणात दाखल होत असल्यामुळे बाजारभावात घसरण दिसत आहे.

**– बापूसाहेब शिर्के, उपसभापती, पारनेर कृ.उ.बाजार समिती**

## पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधीची रक्कम वाढवा खा.नीलेश लंके यांची लोकसभेत मागणी

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, अहिल्यानगर :** पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधी अंतर्गत रूग्णांना देण्यात येणारी ३ लाख ही कमाल रक्कम वाढविण्यात यावी तसेच एका सदस्याची ३५ रूग्णांची मर्यादा हटवून ती अमर्याद करण्याची आग्रही मागणी नगरचे खासदार नीलेश लंके यांनी सोमवारी लोकसभेत केली.




लोकसभेत सभागृहाचे लक्ष वेधताना खा. लंके म्हणाले, पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधी अंतर्गत देण्यात येणारी कमाल रक्कम तीन लाख रूपये आहे. आजाराचा संपूर्ण खर्च भागविण्यासाठी ही रक्कम पुरेशी नसून ही मर्यादा वाढविण्याची गरज आहे. पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधीअंतर्गत एक वर्षात एका सदस्याला ३५ रूग्णांना मदत करता येते. ही मर्यादा योग्य नाही. ही मर्यादा काढून टाकून ती अमर्याद करण्यात यावी अशी मागणी लंके यांनी केली.

पंतप्रधान राष्ट्रीय सहायता निधी अंतर्गत नेमण्यात आलेल्या पॅनलमध्ये रूग्णालयांची संख्या वाढविण्याची आवष्यकता आहे. ही संख्या लवकरात लवकर वाढवून एका तालुक्यात किमान एक रूग्णालय या पॅनलमध्ये घेण्याची म ागणीही लंके यांनी केली. पंतप्रधान राष्ट्रीय निधी अंतर्गत पाठविण्यात येणारे प्रस्ताव हे पोष्टाने मागविले जातात. त्यात बदल करून हे प्रस्ताव ऑनलाईन मागविण्यात यावेत जेणेकरून रूग्णाला कमी वेळेत लवकरात लवकर आर्थिक मदत मिळू शकेल असेही लंके यांनी सांगितले. या योजनेअंतर्गत एखादा विशेष बाब हा पर्याय असायला हवा. एखाद्या रूग्णाचा आजार सुचीमध्ये नसेल तर विशेष बाब या पर्यायातून त्या रूग्णाला मदत करता येईल. असेही लंके यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

## परभणीतील घटनेचे बुलडाणा जिल्ह्यात पडसाद!

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, बुलडाणा :** परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करण्यात आल्याची घटना नुकतीच घडली. पोलिसांच्या कोठडीत असलेल्या कार्यकर्त्याचा मृत्यू झाला आहे. या घटनेचे पडसाद राज्यात उमटत आहे.

सिंदखेडराजा तालुक्यातील मलकापूर पांग्रा येथे आज सोमवारी, १६ डिसेंबर रोजी कडकडीत बंद पाळण्यात आला. परभणी येथील घटनेचे पडसाद ठिकठिकाणी उमटत असल्याचे पाहण्यास मिळत आहेत. महाराष्ट्र बंदचे आवाहन केल्यानंतर राज्यात



अनेक ठिकाणी या बंदला प्रतिसाद मिळत आहे. या घटनेच्या निषेधार्थ मलकापूर पांगरा येथे कडकडीत बंद पाळण्यात आला.

यामुळे गावातील दैनंदिन व्यवहार विस्कळीत झाले. सर्व जाती धर्माच्या लहान मोठ्या दुकानदार, व्यावसायिक, किरकोळ विक्रेते यांनी बंदच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन आपापली दुकाने बंद ठेवली. यावेळी बसस्थानक परिसरात असलेली सर्व दुकाने बंद ठेवण्यात आली होती. या घटनेच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. या दुर्दैवी घटनेची सखोल चौकशी करून दोषीवर कडक कार्यवाही करण्याची मागणी यावेळी गावकऱ्यांकडून करण्यात आली.

बंद यशस्वी करण्यासाठी मलकापूर पांगरा ग्रामपंचायतचे सदस्य राजू साळवे, कैलास साळवे, दिलीप काकडे, बाळू पवार, रामेश्वर सोनकांबळे, गजानन चरवे, किशोर साळवे, अक्षय मगर, आदींनी पुढाकार घेतला.

अक्षराज

## संपादकीय



### ‘लक्ष्या’

जवळपास दोन अडीच दशके मराठी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा लक्ष्या अर्थात लक्ष्मीकांत बेर्डे याचा आज स्मृतिदिन. लक्ष्या म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीला पडलेले एक विनोदी स्वप्न. लक्ष्या या नावाशिवाय मराठी चित्रपटाचा इतिहास लिहिलाच जाऊ शकत नाही. लक्ष्मीकांत बेर्डे या त्याच्या पडद्यावरील नावापेक्षा लक्ष्या या नावानेच तो अधिक ओळखला जातो कारण हे नाव त्याला प्रेक्षकांनी दिले आहे. लक्ष्या हा मराठी प्रेक्षकांना आपल्यातीलच एक वाटायचा म्हणूनच दहा वर्षाच्या मुलापासून ऐंशी वर्षांच्या आजोबांपर्यंत सर्वांनी लक्ष्यावर अतोनात प्रेम केले. जवळपास दोन अडीच दशके आपल्या सहज - सुंदर, विनोदी अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात घर करणाऱ्या लक्ष्याचा जन्म २६ ऑक्टोबर १९५४ रोजी झाला. लहानपणापासून अभिनयाची आवड असलेल्या लक्ष्याने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात टुरटुर या नाटकाद्वारे केला. टुरटुर हे त्याचे पहिलेच नाटक कमालीचे हिट झाले आणि या नाटकातील त्याची भूमिकाही प्रेक्षकांना आवडली. त्यानंतर शांतेचं कार्ट चालू आहे, बिघडले स्वर्गाचे दार या नाटकातून त्याने केलेल्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना भावल्या. ही नाटके देखील हिट झाली. लागोपाठच्या नाटकात विनोदी भूमिका करून लक्ष्या नाट्य सृष्टीत आघाडीचा विनोदी अभिनेता म्हणून पुढे येऊ लागला. याच भूमिकांच्या जोरावर त्याला मराठी चित्रपटातही संधी मिळाल्या. अर्थात नाटका प्रमाणे इथेही त्याला विनोदी भूमिकाच मिळाल्या त्यानेही या भूमिकांचे सोने करत त्याला मिळालेल्या विनोदी भूमिकांना न्याय दिला . त्याच्या विनोदी भूमिका प्रेक्षकांना खूप आवडल्या. त्याची लोकप्रियता वाढू लागली. लक्ष्या या नावाने आबालवृद्धांमध्ये त्याची लोकप्रियता पसरली. त्याचे चित्रपट प्रचंड यशस्वी झाले. त्याची जोडी जमली ती महेश कोठारे यांच्यासोबत. महेश कोठारेंचा चित्रपट आणि लक्ष्या नाही असे सहसा घडलेच नाही. कारण महेश कोठारे आणि लक्ष्या ही जोडी म्हणजे यशाची खात्री अशी ओळखच बनली. या दोघांचा चित्रपट म्हणजे मनोरंजनाची शंभर टक्के हमी. या दोघांनी एकत्रित भूमिका केलेले धूमधडाका, धडाकेबाज, थरथराट, झपाटलेला असे कितीतरी चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी झाले. यशस्वीच नाही तर या चित्रपटांना प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. लक्ष्याने सचिन पिळगावकर यांच्या सोबत केलेला अशी ही बनवा बनवी हा चित्रपट देखील हिट झाला. लक्ष्या आणि अशोक सराफ या दोघांचीही जोडी जमली. या दोघांनी एकत्रित अनेक चित्रपट केले आणि ते यशस्वीही झाले. ८० आणि ९० च्या दशकात लक्ष्या आणि अशोक सराफ या जोडीने मराठी चित्रपट सृष्टीत अक्षरशः धुमाकूळ घातला. ही जोडी म्हणजे मराठी चित्रपट सृष्टीतील राम लक्ष्मणाची जोडी. या दोन्ही कलाकारांचे ट्युनिंग अतिशय चांगले जमले होते. या दोघानी मराठी मनांचे मनोरंजन करीत अनेकांना आयुष्यातील तणाव, दुःख विसरायला लावून आनंदाचे कारंजे फुलविले. मराठीत लोकप्रियतेच्या शिखरावर असताना लक्ष्याला हिंदी चित्रपट सृष्टीतून चांगल्या ऑफर येऊ लागल्या. त्यातील काही ऑफर त्याने स्वीकारल्या. राजश्री प्रॉडक्शन्सच्या मैने प्यार किया या चित्रपटात त्याला सलमान खानच्या मित्राची भूमिका मिळाली ती त्याने छान निभावली. याशिवाय अनेक हिंदी चित्रपटात त्याने भूमिका केल्या मात्र त्याच्या अभिनयाचा कस लागेल अशा भूमिका त्याला हिंदीत मिळाल्या नाहीत त्या त्याला मिळाल्या मराठीतच. पु ल देशपांडे यांनी लिहिलेल्या एक होता विदूषक या जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटात मुख्य भूमिका निभावली ती लक्ष्याने. या चित्रपटात त्याने केलेल्या गंभीर भूमिकेने त्याच्या अभिनय क्षमतेवर शिक्कामोर्तब केले. हा चित्रपट तिकीट बारिवर अपयशी ठरला तरी त्यातील त्याच्या गंभीर भूमिकेने त्याला अनेक पुरस्कार मिळवून दिले. लक्ष्याने विनोदी भूमिका अधिक केल्या आणि त्या यशस्वीही झाल्या म्हणून विनोदी अभिनेता असे त्याचे वर्णन करणे हा त्याच्यावर अन्याय ठरेल. गंभीर भूमिकाही उत्तम प्रकारे करू शकतो हे लक्ष्याने एक होता विदूषक तसेच लेले विरुद्ध लेले आणि सर आले धावून या नाटकातून दाखवून दिले. आयुष्यभर प्रेक्षकांना हसवणारा हा कलाकार १६ डिसेंबर २००४ रोजी प्रेक्षकांना दुःखाच्या सागरात बुडवून काळाच्या पडद्याआड गेला.

**विनोदाचा अचूक टायमिंग साधणारा, अभिनयाची दैवी देणगी लाभलेल्या सर्वांच्या लाडक्या हरहुन्नरी लक्ष्याला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!**

# भय, भूक आणि भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र व्हावा!

राज्यात भाजप, शिवसेना ( शिंदे गट ) व राष्ट्रवादी काँग्रेस ( अजित पवार गट ) यांचे महायुती सरकार विक्रमी बहुमताने स्थापन झाले. आजवर कोणत्याच सरकारला मिळाले नाही इतके विक्रमी बहुमत या सरकारला महाराष्ट्रातील मतदारांनी दिले आहे. या सरकारचा शपथविधी समारंभ नुकताच मोठ्या थाटामाटात पार पडला. माननीय देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची तर माननीय एकनाथ शिंदे व माननीय अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. ३९ आमदारांनी देखील नागपुरात मंत्रीपदाची शपथ घेतली. नवीन मंत्रिमंडळ अस्तित्वात येताच सरकार ॲक्शन मोड मध्ये आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सर्व विभागाची बैठक घेऊन सचिवांना पुढील शंभर दिवसांचा कार्यक्रम आखण्यास सांगितले आहे.



जनतेच्याही या सरकारकडून खूप अपेक्षा आहेत. एक तरुण म्हणून मला तरुणांचे प्रश्न महत्वाचे वाटतात. नव्या सरकारने तरुणांना रोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न करायला हवेत. कारण गेल्या चार पाच वर्षात राज्यात बेरोजगारी प्रचंड वाढली आहे. शिक्षण व गुणवत्ता असूनही तरुणांच्या हाती काम नाही त्यात आर्थिक मंदी आणि कोरोणाने अनेक तरुणांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. सरकारी नोकरभरती बंद आहे. रोजगार नसल्याने राज्यातील तरुण नैराश्याच्या गर्तेत अडकला आहे. या तरुणांना नैराश्याच्या गर्तेतून बाहेर काढायचे असेल तर रोजगार निर्मितीसाठी सरकारने ठोस प्रयत्न करायला हवेत.

बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी उद्योगधंदे वाढीला लागतील यासाठी सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत. मुख्यमंत्र्यांनी नोकर भरतीचे आश्वासन दिले आहे ही आनंदाची बाब असली तरी ही नोकरभरती कंत्राटी नको तर कायम स्वरूपाची हवी. मागील सरकारने नोकर भरतीचे दिलेले आश्वासन हवेतच विरले. या सरकारने तरी नोकर भरतीचे दिलेले आश्वासन पूर्ण करावे.

राज्यातील ४० टक्के लोकसंख्या १८ ते ४५ या वयोगटातील आहे या तरुणांमध्ये प्रचंड ऊर्जा आहे. मेहनत करण्याची त्यांची तयारी आहे. त्यांच्या मेहनतीचा आणि ऊर्जेचा सरकारने उपयोग करून घेतल्यास महाराष्ट्र देशातील नंबर १ चे राज्य बनेल यात शंका नाही. बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी सरकारने उद्योगधंदे वाढीला लागतील यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत. मागील काळात महाराष्ट्रातील काही उद्योग गुजरातमध्ये गेल्याचे आपण पाहिले आहे आता तरी महाराष्ट्रातील उद्योग दुसऱ्या राज्यात जाणार नाही याची दक्षता सरकारने घ्यावी. उद्योगधंद्यात महाराष्ट्र देशात अव्वल क्रमांकावर ठेवण्याचे मोठे आव्हान या सरकारपुढे आहे. महाराष्ट्रात मोठे उद्योग आले तर रोजगारी कमी होऊन राज्याची अर्थव्यवस्था गतिमान होईल.

महायुती सरकारने जे विक्रमी बहुमत मिळवले आहे त्यात राज्यातील लाडक्या बहिणींचा मोठा वाटा आहे. राज्यातील लाडक्या बहिणींनी महायुतीला भरभरून मते दिली आता सरकारनेही लाडक्या बहिणींना विसरु नये. लाडक्या बहिणींना दिलेले २१०० रुपयांचे आश्वासन पूर्ण करावे. त्यासोबतच महागाई करून दार्जिनाही दिलासा द्यावा. लाडक्या बहिणींच्या खात्यावर पैसे पाठवले म्हणजे सरकारचे काम संपले असे नाही तर लाडक्या बहिणींच्या संरक्षणाची जबाबदारी देखील सरकारने घ्यायला हवी. राज्यात महिला अत्याचाराच्या अनेक घटना घडल्या आहेत. तीन वर्षाच्या चिमुरडी पासून साठ वर्षाच्या आजीपर्यंत सर्व वयोगटातील महिला अत्याचाराच्या बळी ठरत आहेत. सरकारने महिला अत्याचाराच्या घटनांना आळा घालून आणि नराधमांना कठोर शिक्षा द्यावी. मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेले शक्ती विधेयक या सरकारने मंजूर करून त्याची अंमलबजावणी करावी.

महाराष्ट्र हे शेतीप्रधान राज्य आहे. मागील काही काळापासून राज्यातील शेतकरी सरकारी धोरणावर नाराज आहे. शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव नाही. सरकारने शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव देत शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवावेत. शेतकऱ्यांसोबत कष्टकरी, कामकरी आणि व्यापारी वर्गाचे देखील प्रश्न सरकारने प्राधान्याने सोडवावेत.

जनतेचा सर्वाधिक पैसा शिक्षण आणि आरोग्यावर खर्च होतो. या सरकारने जनतेचा शिक्षण आणि आरोग्यावर होणारा खर्च कमी करावा. राज्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण आणि नागरिकांना निरोगी आरोग्य लाभेल या दृष्टीने सरकारने धोरणे आखावित. सरकारने सर्वांना परवडेल अशा माफक दरात आरोग्यसेवा पुरवावी. के जी ते पी जी शिक्षण मोफत करावे.

या सरकारने इंदु मिल मधील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक, छत्रपती शिवाजी महाराज यांचे अरबी समुद्रातील स्मारक तसेच बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकांच्या कामाला गती द्यावी. या सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून त्या सोडवण्याचा प्रयत्न करावा. सरकारी कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना लागू करावी. जलसिंचन, नदी जोड सारखे प्रकल्प राबवावेत.

सरकारने प्रशासनातील भ्रष्टाचार मोडून काढावा. राज्यातील स्त्रिया, मुलींना सुरक्षित वाटेल असे कायद्याचे राज्य स्थापन करावे. जाती - जातीत, धर्मा - धर्मात तणाव वाढत आहे. हा तणाव कमी करून राज्यात सौहार्दाचे वातावरण निर्माण करावे. एकूणच या सरकारने भय, भूक आणि भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र निर्माण करावा.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# महाबळेश्वर नगरपरिषदेकडून माझी वसुंधरा चषक २०२४ चे आयोजन

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१६, महाबळेश्वर :** महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषद, मुख्याधिकारी मा. योगेश बाळकृष्ण पाटील यांच्या संकल्पनेतून पाच वर्षांच्या कालखंडानंतर क्रीडा महोत्सव २०२४ चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात महाबळेश्वर शहरातील १३ शाळांमधील सुमारे १२०० विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी होऊन आपले क्रिडा नैपुण्य दाखविणार आहेत. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक खेळाडूला नगरपरिषदेकडून टी- शर्ट व कॅप दिली जाणार असून या क्रिडा महोत्सवाची सुरुवात १७ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ९.०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून क्रिडा ज्योतीचे प्रज्वलन करून क्रिडा रॅलीने होणार



असून ही रॅली मुख्य बाजारपेठेतून गोल्फ मैदान येथे जाईल व गोल्फ मैदान येथे खेळाडूंचे संचलन व मान्यवरांना मानवंदना होऊन ट्रिपल महाराष्ट्र केसरी व सध्या अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत असणारे श्री. विजय चौधरी यांच्या हस्ते ध्वजारोहण होऊन स्पर्धेचे उदघाट्न होणार आहे.

> या स्पर्धेचे विशेष आकर्षण म्हणजे जास्तीत जास्त पदके जिंकणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक गटातील मुले व मुली असे एकूण चार जनरल चॅम्पियनशिप विजेते काढण्यात येणार असून त्यासाठी मोठे चषक शाळेस प्रदान केले जाणार असून हा गौरव विद्यार्थ्यांच्या खेळातील गुणवत्ता व शालेय संघाच्या एकत्रित मेहनतीचे प्रतीक ठरेल तसेच विद्यार्थ्यांना व संस्थेस प्रेरणादायी ठरेल , तरी महाबळेश्वर मधील नागरिक - पालक व क्रिडाप्रेमींनी या महोत्सवाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे
>
> **-योगेश पाटील, प्रशासक तथा मुख्याधिकारी**

गेले ५ वर्षांपासून बंद पडलेला क्रिडा महोत्सव परत नव्या पर्वाने सुरु करत क्रिडा महोत्सव २०२४ हा एकूण ११ खेळ प्रकारात व ४ गटातील मुले व मुली या गटात पार पडणार असून विजेत्या खेळाडूंना सुवर्ण, रौप्य , कांस्य पदक व प्रशिस्तीपत्रक व सर्व सहभागी खेळाडूंना प्रशिस्तीपत्रक देऊन गौरविण्यात येणार आहे . सदरच्या स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी मुख्याधिकारी योगेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषद अधिकारी - कर्मचारी व विविध शाळांमधील शिक्षक असे सुमारे ४० जण मेहनत घेत आहेत.

### आंदोल..

गठबंधनी सरकार
सावरा सतत तोल
दे महत्व बरोबरीने
राखे नीत समतोल

संख्याबलानुसारचं
मिळो प्रत्येकांमोल
करावे खाते वाटप
विचारांती सखोल

सारीसत्ता आम्हांस
नको उगा डामडौल
जाणूनघ्या समजून
जनतेने दिला कौल

स्पष्टता हवी विचारे
नकोउत्तरे गोलगोल
जरा पाऊल चुकता
होऊ शकतो झोल

अपसमजा मुळे ती
गठबंधने होई फोल
परिपूर्ण जिम्मेदारी
पारपाडे आपलेरोल

खात्यापेक्षा किंमती
जनसेवा ही अमोल
सत्ता येणारं जाणारं
जसा झुलवे आंदोल

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेगवान अचूक बातमी

# भिवंडी-निजामपूर मनपा चा २३ वा वर्धापन दिन साजरा

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१६, भिवंडी (ठाणे) :** भिवंडी- निजामपूर महानगरपालिकेचा २३ वा वर्धापन दिन येथील सभागृहात महानगरपालिका आयुक्त अजय वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली अत्यंत दिमाखात संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने महानगरपालिकेच्या दैनंदिन कामकाजात उत्कृष्ट योगदान दिलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा आयुक्त अजय वैद्य



यांच्या हस्ते मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देवून गौरव करण्यात आला.

सदर कार्यक्रमाकरिता जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांना मोटिवेशनल स्पीकर आणि विशेष अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी मनोज सानप यांनी शहीद कॅप्टन विनायक गोरे या एकपात्री अभिनय प्रयोगाच्या माध्यमातून उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता देशसेवा, समाजसेवा आणि दैनंदिन प्रशासकीय काम उत्कृष्ठ करण्याविषयी प्रोत्साहनात्मक, प्रबोधनात्मक सादरीकरण केले.

# महापालिका कार्यक्षेत्रात १०० दिवसीय क्षयरोग शोध मोहिम

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१६, पनवेल :** २०२५ पर्यंत शाश्वत विकासाचे स्वप्न साकार करताना क्षयरोग मुक्त भारत करण्याच्या उद्देशाने १०० दिवसीय क्षयरोग मोहिम देशातील ३४७ जिल्हांमध्ये राबविण्यात येत आहे. त्यामध्ये रायगड जिल्ह्याचा समावेश आहे. जास्तीत जास्त नवीन रूग्णांना त्वरीत उपचाराखाली आणणे, क्षयरुग्णांचा मृत्यूदर कमी करणे, क्षयरोग सहवासितांना क्षयरोग प्रतिबंधक औषधोपचार देणे तसेच मोठ्या प्रमाणावर क्षयरोगाबाबत जनजागृती करणे हा या मोहिमेचा उद्देश आहे.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहरात दिनांक ७ डिसेंबर पासून या मोहिमेस सुरुवात झाली आहे. या मोहीमेंतर्गत संपूर्ण पनवेल मनपा क्षेत्रातील अतिजोखमीच्या भागांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. या सर्वेक्षणातून अतिजोखमीची संख्या एकत्रित करण्यात येत आहे. पुढील १००




दिवसात जोखीमग्रस्त भागांतील संशयितांची तपासणी करण्यात येत असल्याची माहिती मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिली आहे.

सदर तपासणीमध्ये अतिसंशियित संभाव्य रूग्णाचे छातीचे एक्सरे आणि क्षयरोग चाचणी (सीबीएनएएटी) करण्यात येत आहे. आतापर्यंत ७,९०५ संशयित रूग्णाची तपासणी करण्यात आली. यामध्ये तळोजा कारागृहातील २,७४० कैद्यांची तपासणी करण्यात आली. तसेच एकूण १,१७९ संभाव्य रूग्णांचे छातीचे एक्सरे काढले आहेत. याबरोबरच १२५ संभाव्य रूग्णाची क्षय रोग चाचणी (सीबीएनएएटी) करण्यात आली आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज

# थोडक्यात

## पनवेल मनपाद्वारे कुष्ठरोग सुरक्षित महाराष्ट्र 'कुसूम' अभियानाचा शुभारंभ



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१६, पनवेल :** समाजातील सर्व लपलेले कुष्ठरुग्ण शोधून त्यांना बहुविध औषधोपचार खाली आणण्याकरिता आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली १६ ते २० डिसेंबर पर्यंत कुष्ठरोग सुरक्षित महाराष्ट्र (कुसूम) अभियान महापालिका कार्यक्षेत्रात राबविले जाणार आहे. या अभियानाचा शुभारंभ आज नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ६ येथे करण्यात आला. यावेळी मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.आनंद गोसावी, माजी नगरसेवक डॉ.अरूणकुमार भगत, कुष्ठरोग अधिकारी डॉ.वैभवी निंबाळकर, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका उपस्थितीत होते. यावेळी मार्गदर्शन करताना मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.गोसावी यांनी उपस्थितांना कुष्ठरोगाबाबत माहिती देऊन महापालिकेच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कुष्ठरोगावर उपचार केले जात असल्याचे सांगितले. नागरिकांनी उपचारासाठी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा असे सांगितले. तसेच या अभियानांतर्गत आशा सेविका सर्वेक्षणास आल्यास नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले. आपल्या मनोगतात माजी नगरसेवक डॉ. अरूणकुमार भगत यांनी महापालिकेने एकुण २६ प्राथमिक आरोग्य केंद्रे सुरू करून उत्तम आरोग्य सेवा देत असल्याबद्दल कौतुक करून, समाधान व्यक्त केले.

या विशेष सर्वेक्षणामध्ये वंचित राहणाऱ्या, दुर्लक्षित राहणाऱ्या गटांवर उदा. विटभट्टी कामगार, खाण कामगार, स्थलांतरित व्यक्ती, बांधकाम मजुर, निवासी, आश्रमशाळेत राहणारे विद्यार्थी, कंपनीत काम करणारे कामगार इत्यादींवर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. या गटातील लोक हे कामाकरिता, मजुरीकरिता लवकर घर सोडतात व उशिरा घरी परत येतात. यामुळे अशा व्यक्तींची आरोग्य तपासणी नियमित सर्वेक्षण अथवा कुष्ठरोग शोध मोहिमेमध्येही होत नाही. ही बाब लक्षात घेवून या घटकांसाठी कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) राज्यात राबविण्यात येत आहे. महापालिका कार्यक्षेत्रात तळोजा कारागृह, खाणी, बांधकामाच्या साइट्स, निवासी आश्रमशाळा अशा विविध ठिकाणी त्वचारोग तज्ञ, आशा वर्कर, बहुद्देशीय कर्मचारी यांच्या माध्यमातून हे सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

## मुस्लीम समाजाच्या आरक्षणाला उपमुख्यमंत्री अजितदादा यांचा हिरवा कंदील



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.१६, धाराशिव :** मुस्लीम समाजाच्या ५ टक्के आरक्षणाला उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी हिरवा कंदील दाखविला असून लवकरच हे आरक्षण घोषीत करण्यात येईल. असे आश्वासन त्यांनी दिले असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश संघटक खलील पठाण यांनी दिली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश संघटक सचिव खलील पठाण यांनी नागपूर येथे नवनिर्वाचित आमदारांच्या सत्कार समारंभ सोहळ्यामध्ये महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना मुस्लिम समाजाला ५ टक्के आरक्षण या चालू हिवाळी अधिवेशनामध्ये मंजूर करून घ्यावे. अशा विनंतीचे निवेदन दिले. त्यानंतर उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी निवेदनाचे सर्वांसमोर वाचन करून खलील पठाण यांना आश्वासित केले की, महायुती सरकारच्या काळात या प्रश्नावर चर्चा करून निर्णय घेण्यात येईल. हा प्रश्न आपण स्वतः लक्ष घालून मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

## साने गुरुजी या विषयावर हेरंब कुलकर्णी यांचे व्याख्यान संपन्न



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१६, मुदखेड (नांदेड) :** स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारड तालुका मुदखेड जिल्हा नांदेड व शिक्षण विभाग पंचायत समिती मुदखेड आयोजित 'मातृऱ्हदयी शिक्षक साने गुरुजी' या विषयावर हेरंब कुलकर्णी यांचे व्याख्यान आज दि.१६ डिसेंबर रोजी संपन्न झाले. साने गुरुजी यांच्या १२५ व्या जयंती निमित्त शिक्षणतज्ञ व सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांनी शंभर व्याख्यानाचे महाराष्ट्रभर आयोजन करण्याचा निश्चय केला त्याचाच एक भाग म्हणून आज श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय व स्वातंत्र्य सेनानी राजारामबापू माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारड व शिक्षण विभाग पंचायत समिती मुदखेड यांच्या संयुक्त विद्यमाने मातृहृदयी साने गुरुजी या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते.

याप्रसंगी प्रमुख व्याख्याते म्हणून हेरंब कुलकर्णी हे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष रुस्तुम आडे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती मुदखेड प्रमुख पाहुणे व्यंकटेश चौधरी शिक्षण अधिकारी महानगरपालिका नांदेड सुरेश पाटील शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती मुदखेड हे व्यासपीठावर उपस्थित होते याप्रसंगी स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संजयराव देशमुख बारडकर व सर्व संचालक मंडळ तथा तालुक्यांमधून आलेल्या शिक्षकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. हेरंब कुलकर्णी यांनी साने गुरुजी यांचे मातृहृदय उलगडताना त्यांच्या जीवनावर प्रकाश टाकला त्यांचे साहित्यिक योगदान शैक्षणिक योगदान सामाजिक योगदान अतिशय सुंदर रित्या शिक्षकांसमोर उघडून दाखवले व सर्वांना मंत्रमुग्ध केले या प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक डॉ.पंजाब शिंदे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार एम बी ओसावर यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीरीत्या पार करण्यासाठी मुख्याध्यापक राम किशन चुबेवार प्राचार्य हेमंत इंगळे व सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# धर्मासाठी एल्गार, बजरंग दलाचे मुंबईत शौर्य संचलन

## तब्बल 10 हजार बजरंगी सहभागी; 30 हजार मंदिर परत घेण्याचा निर्धार



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१६, मुंबई :** बजरंग दलाच्या वतीने कोकण प्रांतात एकूण ४ ठिकाणी शौर्य संचलन, यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. त्यापैकी रायगड, सिंधुदुर्ग, गोवा या ठिकाणी ८ डिसेंबर २०२४ रोजी शौर्य संचलन हजारो कार्यकर्त्यांच्या उपस्थित पार पडले.

१५ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ठीक ४ वाजता राजा बढे चौक येथे तब्बल १० हजार बजरंगीच्या उपस्थितीत शौर्य संचालन पार पाडले. शौर्य संचलनात बजरंग दलाच्या गणवेशात शिस्तबद्धपणे बजरंगींनी संचलन केले. संचलन नंतर राजा बडे चौक, छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथेच सभेसाठी प्रमुख अतिथी म्हणून भारतीय सैन्य दलातील कमांडर भूषण देवन व प्रमुख वक्ते म्हणून स्वामी विज्ञानानंद उपस्थित होते.

या संचलनात १० हजाराहून अधिक बजरंगी सहभागी झाले होते. गीता जयंतीच्या निमित्ताने बजरंग दलाच्या वतीने प्रत्येक वर्षी शौर्य संचलनाचे आयोजन केले जाते. असे गौतम रावेरीया बजरंग दल कोकण प्रांत सहसंयोजक यांनी सांगितले.

### डाव उधळून लावू

बजरंग दलाच्या मुंबई क्षेत्राचे क्षेत्र संयोजक विवेक कुलकर्णी यांनी सांगितले बाबर सहित सर्वच इस्लामी आक्रांतीनी या देशातील मंदिरे उध्वस्त करून संस्कृती नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. हे दहशतवादाचे सर्वप्रथम उदाहरण आहे. हिंदूंच्या माहिला मुलींना लव्ह जिहाद करून बाटली, हिंदूंचे आराध्य गोमातेला कापणे हे सर्व भारतावर इस्लामी दहशतवादाचे राज्य स्थापित करण्याचे प्रयत्न आहेत. परंतु बजरंग दल हे कदापि होऊ देणार नाही.

### देशभक्तांची फळी करा

देव, देश, धर्म रक्षणासाठी बजरंग दलाचे कार्यकर्ते नेहमीच सज्ज असतात. त्यासोबत युवकांमध्ये वाढलेली व्यसनाधीनता रोखण्यासाठी व्यसनमुक्ती अभियान, सामाजिक समरसता वृद्धिंगत होण्यासाठी सेवा उपक्रम, राष्ट्रीय एकात्मता देशाची अखंडता अवाधित राखण्यासाठी विविध उपक्रम बजरंग दल वर्षभर राबत असते. बजरंग दल या माध्यमातून देशभक्त युवकांची फळी निर्माण करण्यासाठी बजरंग दलात सहभागी घेवू.

### कांतीकारांच्या बलिदानामुळे आपण स्वातंत्र्य

प्रमुख वक्ते वर्ल्ड इकॉनोमिक कोरम चे स्थापक स्वामी विवेकानंद यांनी सांगितले आपण सर्वच शूरवीर परमप्रतापी योद्धांचे वंशज आहोत. या देशावर कित्येक आक्रमकांनी आक्रमण केले. परंतु तरीही या देशाची सभ्यता संस्कृती कोणीही मिटवू शकले नाही. हिंदूंनी त्यांच्या भाषेत आक्रमकतेने उत्तर दिले पाहिजे. देशातील युवकांनी हे विसरता कामा नये. की या देशात भगतसिंग, चंद्रशेखर आजाद, सुखदेव, राजगुरू अशा कित्येक क्रांतीकारकांनी बलिदान दिल्यामुळे आज आपण स्वतंत्र आहोत. देश शौर्याने बनलेला आहे. देशाचे रोल मॉडेल बॉलीवूडचे हिरो नसून बलिदान देणारे असंख्य क्रांतिकारक आहेत. विवेक कुलकर्णी बजरंग दल मुंबई क्षेत्र संयोजक, मोहन सालेकर कोकण प्रांत मंत्री, रणजित जाधव बजरंग दल प्रांत संयोजक, गौतम रावरीया प्रांत सहयोजक उपस्थित होते.

## नेहा गवळी यांना राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार प्रदान

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.१६, बदलापूर (ठाणे) :** प्रेरणा फाऊंडेशन आणि प्रेरणा रंगमंच नाट्यमंडळ महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या वतीने बल्लाळेश्वर मंगल कार्यालय बदलापूर येथे नुकताच लेखिका, नाट्यकर्मी, निर्मात्या, दिग्दर्शिका प्रेरणा गांवकर कुलकर्णी आणि गझलकार सुनंदा पाटील यांच्या हस्ते राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार देऊन सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उत्तम कार्य केल्याबद्दल नेहा मारुती गवळी यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी त्यांना सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल व पुष्प गुच्छ देऊन गौरविण्यात आले. यावेळी मंचावर अभीनेत्री लेखा तोरस्कर, एंटी पायरेसी सेल अधिकारी रामजित गुप्ता, एडवोकेट प्रशांत तांबे, राष्ट्रीय खेळाडू दुर्गा गुंजाळ, दीनदयाल कुष्ठ रोग संस्था अध्यक्ष अविनाश म्हात्रे, समाजसेवक वैभव कुलकर्णी, आदि मान्यवर उपस्थित होते.

मागील कित्येक वर्षापासून सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आरोग्य, सांस्कृतिक या सारख्या समाजोपयोगी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील मान्यवरांना प्रेरणा



सामाजिक सेवा व नाट्यमंडळ संस्थेच्या वतीने पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते.

नेहा गवळी या मागिल २१ वर्षापासून विद्यादीप विद्यालय कोपरखैरने नवी मुंबई च्या मुख्यध्यापिका तसेच संस्थेच्या सहसचिव म्हणून कार्यरत आहेत. त्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नियमितपणाने विविध उपक्रमांचे आयोजन करतात.

तसेच त्या महाराष्ट्र राज्याच्या स्वाभिमानी शिक्षक संघटनेच्या महिला राज्य अध्यक्षा तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षक समन्वयक संघाच्या मुख्य समन्वयक म्हणून विना अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी कार्यरत आहेत. त्यांच्या मार्फत महिलांसाठी विविध बचतगटाचे कार्य चालते. मागील वर्ष २०२२-२३ व यंदा २०२४ मध्ये त्यांच्या नेतृत्वाखाली हजारो शिक्षकांनी आझाद मैदान मुंबई येथे आंदोलन पुकारले होते. त्यांच्या नेतृत्वाने यशस्वी लढा दिला आणि अनुदानाचा २० टक्के वाढीव टप्पा मिळवण्यात यश प्राप्त करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्या या कार्याचे विशेष कौतुक म्हणून प्रेरणा नाट्यमंडळ व सामाजिक संस्था यांच्या वतीने राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार देऊन विशेष सन्मान केला आहे.

आतापर्यंत नेहा गवळी यांना नारी रत्न, सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका, महायोगी गगनगिरी पुरस्कार, उत्तम मुख्याध्यापिका, शिक्षक रत्न, आधार सामाजिक सेवा संस्था कोल्हापूर यांचा राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार, आविष्कार शोशल व एज्युकेशनल संस्थेचा स्त्री सन्मान पुरस्कार यासारख्या विविध राज्यस्तरीय व आंतरराज्यीय पुरस्काराने सन्मानित केले आहे.

या पुरस्काराने त्यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. विद्यादीप शिक्षण संस्था, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग व विद्यार्थी यांच्यावतीने त्यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.

## सुपा शहरातील आंबेडकर भवनाची सुरक्षिता धोक्यात मनसे नेते अविनाश पवार

**अक्षराज : राजकूमार इकडे**

**दि.१७, सुपा (अहिल्यानगर) :** सुपा शहरातील नगर-पुणे महामार्गावरील भारत रत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाकडे स्थानिक सुपा ग्रामपंचायत सह सर्वच राजकीय पुढाऱ्यांनी दुर्लक्ष केले आहे.

त्यामुळे स्थानिक आंबेडकरी जनतेच्या भावना लक्षात घेऊन सुपा शहरातील तमाम सर्व सामान्य जनतेच्या वतीने सुपा ग्रामपंचायतीला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने निवेदन देऊन शांततेच्या मार्गाने लक्ष वेधण्यात आले की, भारत रत्न डॉ आंबेडकर भवनाचे छत गळत आहे. आतमध्ये स्मारकाला जाळ्या नसल्याने धुळच- धुळ, गेट खराब असल्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची सुरक्षितता धोक्यात आली आहे. अत्ताच गेल्या आठवड्यात परभणीमध्ये जी घटना




घडली समाज कठंकानी ज्या पद्धतीने गैर कृत्य केले तसं काही इथं झाले तर जिम्मेदार कोण....? हे दुर्दैवी आहे. त्यामुळे आपण या गोष्टीचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. व तात्काळ उपाययोजना करुन दुरुस्ती करावी.

३१ डिसेंबर, १ जानेवारी रोजी सालाबादप्रमाणे आमचे असंख्य आंबेडकर समाज बांधव मोठ्या संख्येने भिमा कोरेगाव येथे विजय स्तंभाच्या दर्शनासाठी जात असतात. तरी रात्री प्रवासा दरम्यान विसाव्यासाठी नगर पुणे महामार्गावरील सुपा येथे आंबेडकर भवनात थांबत असतात. त्यांची गैरसोय होऊ नये. म्हणून आपणास आंबेडकर जनतेच्या वतीने विनंती करण्यात येते की, आपण आमच्या भावनांचा आदर करुन आंबेडकर भवनाच्या सभागृहातील सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. जर आमच्या भावनांचा आदर ठेवला नाही. तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या तसेच आंबेडकर समाज बांधवांच्या रोषाला सामोरे जावे लागेल.

यावेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर यास पुर्णपणे सुपा ग्राम पंचायत जिम्मेदार राहिल याची गांभीर्याने दखल घ्यावी. ही वेळ सुपा ग्रामपंचायत येऊ देणार नाही. अशी अपेक्षा महाराष्ट्र नवनिर्माण माथाडी कामगार सेनेचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष अविनाश पवार यांच्या सह महाराष्ट्र नवनिर्माण सेना सुपा शहर अध्यक्ष अक्षय सुर्यवंशी यांनी व्यक्त केले.

यावेळी जानकु सुर्यवंशी, तुषार बोरगे, सागर गायकवाड, शेखर जाधव, सचिन उमाप, सागर सुर्यवंशी, नितीन जाधव, दिपक सुर्यवंशी, अतिश सुर्यवंशी, विशाल जाधव, बबन औचीते, भैय्या जाधव, सागर भाऊ शिंदे इ.नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बसचे अपघात टाळण्यासाठी उपाययोजना राबविणार - मुख्यमंत्री

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६ :** मुंबईतील बेस्ट बसच्या अपघाताची घटना गंभीर असून राज्य शासनाने याची दखल घेतली आहे. अशा घटना घडू नये. यासाठी उपाययोजना केल्या जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. विधानपरिषदेत नियम २८९ अन्वये विधान परिषद सदस्य सुनील शिंदे यांनी मांडलेल्या प्रस्तावावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. श्री. फडणवीस म्हणाले की, 'बेस्ट' बसच्या अपघातातील वाहनचालकाची तपासणी केली आहे.

या घटनेनंतर यादृच्छिक (रॅन्डम) पद्धतीने तपासणी करण्यास सुरूवात केली आहे. बेस्टमध्ये नवीन बसेस घेण्यासाठी १३०० बसेसची मागणी नोंदविण्यात आली असून त्या लवकरच बस 'बेस्ट'च्या ताफ्यात येणार आहेत. बेस्ट बसेसची वस्तुस्थिती जाणून घेऊन उपाययोजना राबविण्यासंदर्भात मुंबई महापालिका आयुक्तांना 'बेस्ट' प्रमुखांशी चर्चा करून आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## शाश्वत भविष्याकरिता माहिती व ज्ञानाच्या आदानप्रदानासाठी सिंगापूर विद्यापीठातील विद्यार्थ्यांची नमुंमपा भेट

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१६, नवी मुंबई :** सिंगापूर नॅशनल युनिव्हर्सिटी च्या विद्यार्थ्यांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयास भेट देत पालिकेच्या विविध प्रकल्पांची व उपक्रमांची माहिती जाणून घेतली आणि भारतातील एका आधुनिक शहराला भेट दिल्याचा आनंद व्यक्त केला.

रिलायन्स फाऊंडेशन इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन अँड रिसर्च संस्थेद्वारा संचालित जिओ इन्स्टिट्युटच्या समन्वयातून सिंगापूर मॅनेजमेंट युनिव्हर्सिटीच्या १० विद्यार्थ्यांनी त्यांच्या भारत देशाच्या अभ्यासभेटीत नवी मुंबई शहरास भेट दिली.

या दरम्यान त्यांनी पालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्याशी संवाद साधत इतर शहरांपेक्षा नवी मुंबईच्या असलेल्या वेगळे पणाविषयी भाष्य केले. आयुक्तांनी विद्यार्थी व त्यांचे प्राध्यापक यांच्याशी चर्चा करीत नवी मुंबई शहराचे वेगळेपण तसेच याठिकाणी सुरू असलेले प्रकल्प व पर्यावरणशील उपक्रम याविषयी सविस्तर माहिती दिली.

भारतातील बाजारपेठ व गुंतवणूक याविषयीचा अभ्यास करण्यासाठी आलेला हा सिंगापूर देशातील अभ्याससमुह भारत देशात माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीचा वेग आणि त्याचा परिणाम याविषयी माहिती संकलित करीत आहे. तसेच विकास प्रक्रियेत शाश्वत पद्धतींचा वापर करण्याची पर्यावरणपूरक भूमिका याविषयी अभ्यास करीत आहे.

या अनुषंगाने भारतातील कार्यक्षम महानगर पालिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवीमुंबई महानगर पालिकेतील घनकचरा व्यवस्थापन तसेच पाणीपुरवठा



व सांडपाणी व्यवस्थापन या स्वच्छतेशी निगडीत बाबींची माहिती घेण्यासाठी या विद्यार्थी समुहाने नवी मुंबईस भेट दिली.

यामध्ये त्यांनी पावसाळी पाण्याचे व्यवस्थापन, कांदळवनांची जपणूक, मियावाकी शहरी जंगल व इतर पर्यावरणपूरक उपक्रम व कामे, हवा गुणवत्ता, सौरऊर्जा आणि पदपथांवरील दिव्यांच्या व्यवस्थापनातून वीजबचतीवर दिला जाणारा भर, पुनर्प्रक्रियाकृत पाण्याचा उद्यानां साठी होणारा वापर अशा विविध विषयांवर सविस्तर माहिती जाणून घेतली.

महापालिका सचिव चित्रा बाविस्कर यांनी या अभ्यासभेटीच्या समन्वयक अधिकारी म्हणून काम पाहिले. सिंगापूर व्यवस्थापन विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसोबतच या अभ्यास दौऱ्यात विद्यापीठाचे मार्केटिंग विभागप्रमुख डॉ. सेशन रामास्वामी, स्टुडन्ट अफ ेअर्सच्या विभागप्रमुख प्रा. सुरिंदर कौर व व्यवस्थापक प्रा.अविनाश झा आणि जिओ इन्स्टिट्युटचे सुरक्षा विभाग म ार्गदर्शक जयेंद्र भोसले उपस्थित होते.

## थोडक्यात

### डी.एन.नगर शाळेच्या खेळाडूंची राष्ट्रीय रग्बी स्पर्धेसाठी निवड

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.१६, मुंबई :** अंधेरी येथील डी.एन.नगर महानगरपालिका शाळेतील विद्यार्थी गौरव संदीप शिंदे आणि इम्रान अहमद सोहेल शेख यांची चौदा वर्षांखालील

मुलांच्या महाराष्ट्र राज्य रग्बी संघात निवड झाली आहे. हे दोन्ही खेळाडू ३१ डिसेंबर ते ३ जानेवारी दरम्यान बिहार, पटना येथे होणाऱ्या राष्ट्रीय रग्बी स्पर्धेत म हाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत. या यशासाठी शारीरिक शिक्षण विभागाचे वरिष्ठ पर्यवेक्षक राजेश गाडगे, कनिष्ठ पर्यवेक्षक बाबासाहेब शिंदे, मुख्याध्यापिका समिना कट्टेवाला, रक्षा पटेल, अमोल पाटील, उप मुख्याध्यापिका स्मिता बाजी, शारीरिक शिक्षक आणि प्रशिक्षक ओमकार तळेकर यांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन लाभले आहे. गौरव व इम्रान यांनी या निवडीसाठी कठोर परिश्रम घेतले असून त्यांचे खेळ कौशल्य आणि समर्पण यामुळे त्यांना ही संधी प्राप्त झाली आहे. या खेळाडूंचे व त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या शिक्षकांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत असून आगामी राष्ट्रीय स्पर्धे साठी त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या जात आहेत.


### अल्पसंख्याक हक्क दिवस बुधवारी कार्यक्रमाचे आयोजन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, नांदेड :** अल्पसंख्याक हक्क दिवसानिमित्ताने अल्पसंख्यांकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशीर हक्काबाबत जाणीव किंवा माहिती करून दिली जाणार आहे. त्याअनुषंगाने बुधवार, दिनांक १८ डिसेंबर २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे सकाळी ११ वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात व्याख्याता म्हणून सेवानिवृत सहसचिव ॲड. देविंदरसिंघ निर्मले व नांदेड सामाजिक विज्ञान नारायणा ई-टेक्नो स्कुलचे विभाग प्रमुख इरशाद अहमद हे संबोधित करणार आहेत. अल्पसंख्यांक समाजातील नागरीकांनी आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केला आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेने दि. १८ डिसेंबर, १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांच्या हक्काचा जाहीरनामा स्विकृत करून प्रस्तुत केला आहे. त्यानुसार अल्पसंख्याक नागरिकांना त्यांची संस्कृती, भाषा, धर्म, परंपरा इत्यादींचे संवर्धन करता यावी यादृष्टीने प्रयत्न करण्याबाबत राष्ट्रीय आयोगाने सूचना दिल्या आहेत. त्यानुसार प्रत्येकवर्षी १८ डिसेंबर हा दिवस जिल्हा प्रशासनाच्यावतीने अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणून राबविण्यात येतो. अल्पसंख्याक विकास विभाग परिपत्रक क्र. अविवि' २०२२/प्र.क्र.५१/का-८ दि.१६.१२.२०२४ नुसार अल्पसंख्याक नागरिकांना त्यांच्या घटनात्मक व कायदेशीर हक्कंची जाणीव / माहिती देण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत असे सूचना प्राप्त आहेत.

### राज्यात प्रथमच एचपीव्ही चे सामूहिक लसीकरण

### एचपीव्ही प्रतिबंधक लस बी.जे.वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मोफत




**अक्षराज : वृत्तसंकलन**


**दि.१६, पुणे :** ह्युमन पॅपिलोमा व्हायरस (एचपीव्ही) हा गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगासह (सर्व्हायकल कॅन्सर) विविध प्रकारच्या कर्करोगांस कारणीभूत ठरतो. यामुळे एचपीव्ही प्रतिबंधक लस बी.जे.वैद्यकीय म हाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मोफत दिली जाणार आहे. ही लसीकरण मोहीम दिनांक १७ डिसेंबर २०२४ पासून सुरू होत आहे.

राज्यात प्रथमच अशा प्रकारे एचपीव्ही सामूहिक लसीकरण केले जात असल्याचा दावा महाविद्यालयाने केला आहे. बी.जे.वैद्यकीय म हाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.एकनाथ पवार यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी जन औषधवैद्यकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. मुरलीधर तांबे आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ.यल्लप्पा जाधव उपस्थित होते.

महाविद्यालयात वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या १ हजार विद्यार्थ्यांना लस देण्याच्या उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ही लस घेणे विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक नसून ऐच्छिक आहे. सुरूवातीच्या टप्प्यात लसीकरणात विद्यार्थिनींना प्राधान्य दिले जाणार असून, त्यानंतर विद्यार्थ्यांना लस दिली जाईल. या लसीकरणात सिरम इन्स्टिट्यूटची सर्व्हाव्हॅक ही एचपीव्ही लस दिली जाणार आहे.याबाबत डॉ. पवार म्हणाले की, वैद्यकीय आणि परिचर्या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना एचपीव्ही लस देण्यात येणार आहे.

गेल्या काही वर्षांपासून गर्भाशयाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. एचपीव्ही लस महिलांसोबत पुरुषांसाठीही आहे. ही लस घेऊन पुरुष जननेंद्रियाच्या कर्करोगाला प्रतिबंध करू शकतात. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमात या लशीचा अद्याप समावेश नाही मात्र, खासगी रुग्णालयात ही लस देण्यात येते. सध्या ९ ते १४ वर्षे वयोगटातील व्यक्तींना या लशीचे दोन डोस देण्यात येतात तर १५ ते २६ वयोगटातील व्यक्तींना ३ डोस देण्यात येतात. या लसीकरणासाठी सिरम इन्स्टिट्यूट ३ हजार डोस उपलब्ध करून देणार आहे.एचपीव्ही संसर्ग हा विविध प्रकारच्या कर्करोगांना कारणीभूत ठरतो. त्यामुळे वैद्यकीय आणि परिचर्या अभ्यासक्रम ाच्या विद्यार्थ्यांना लस देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात प्रथमच अशा प्रकारे महाविद्यालयाकडून एचपीव्ही लसीकरण मोहीम हाती घेण्यात आली आहे.

## विंचूर येथे दत्त जयंतीनिमित्त श्री स्वामी समर्थ केंद्रात गुरुचरित्र पारायणाची सांगता





**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१६, विंचूर (नाशिक) :** नाशिक जिल्ह्यातिल विंचूर येथील श्री स्वामी समर्थ केंद्रात शीगुरु दत्त महाराजांच्या जयंती निमित्त अखंड नामजप, यज्ञ स्वाहाकार, गुरुचरित्र पारायण, पहरे आदी सेवा संपन्न झाली आहे. श्री दत्त जयंती उत्सव अखंड नाम याग श्री गुरुचरित्र पारायण सप्ताह दिनांक ०८ डिसेंबर रोजी ग्रामदेवतेचा सन्मान व मंडल मांडणीने प्रारंभ झाला. मंडल स्थापना स्थापित देवता हवन झाले.

१० डिसेंबरला नित्यस्वाहाकारासह गणेश आणि मनोबोध याग झाला. मंडळ स्थापना स्थापित देवता हवन झाले. १० डिसेंबरला नित्यस्वाहाकारासह गणेश याग आणि मनोबोध याग झाला. शुक्रवार दिनांक तेरा नित्य स्वाहाकार चंडीयाग पार पडला. शनिवार दिनांक चौदा रोजी नित्य स्वाहाकार रुद्र याग, म ल्हारी याग तसेच सायंकाळी सामुदायिक दिवट्या काढण्यात आल्या. त्यात ३०० सेवेकरी यांनी सेवेत भाग घेऊन गावचे विंचुरकर जहागीरदारांची बांधलेले श्री काशी विश्वनाथ महादेव मंदिरात जाऊन पाच पावले करून परत महाराजांच्या दरबारात महाराजांना ओवाळून, देव नाचून, भंडारा उधळून, खंडोबाची व देवीची आरती करून सांगता झाली. दिनांक पंधरा रविवार नित्य स्वाहाकार बली पूर्णाहुती दु.१२:३९ वाजता श्री दत्त जन्मोत्सव साजरा करण्यात आला.

दिनांक १६ सोमवार रोजी श्री सत्यदत्त पुजन, देवता विसर्जनाने अखंड नाम जप, यज्ञ, सप्ताहाची सांगता होऊन भाविक सेवेकरी यांनी महाप्रसाद घेतला. यावेळी हितगुजातुन सुभाष रनाळकर (नाशिक) सांगतात सध्या मुला- मुलींचे विवाह जमवणे खूप अवघड झाले असून, त्यासाठी अण्णासाहेबांनी श्री स्वामी समर्थ प्रत्येक केंद्रात व स्वामींच्या मेळाव्यात विवाह संस्कार या विभागातून सेवेकऱ्यांना विवाह विषयी फॉर्म भरून, नोंदणी करून, लग्न जमवले जाते, विनामूल्य विवाह सामुदायिक पद्धतीने या केंद्रामार्फत केले जाते. याबद्दल यांनी आपल्या मोबाईलवर विवाह नोंदणी बद्दल संपूर्ण माहिती आपल्या मोबाईलवर दिली जाते. ज्यांना समजले नसेल त्यांनी आपआपल्या केंद्रात जाऊन आमच्याशी मोबाईलवर संपर्क साधावा.

तसेच मेघा नागरे (विवाह विभाग नाशिक जिल्हाप्रमुख) यांनी आपल्या वित्तगुजातून गुरुचरित्र पारायण आपण का करतो ? याबद्दल सेवेकऱ्यांसोबत प्रश्न- उत्तर यासंदर्भातून चर्चा करून, सोळा संस्कार या विषयातून मुलींनी जीन्स पॅन्ट किंवा मुलांचा पोशाख घालूनये, त्यांच्या भविष्यात पुढे संतती होण्यास किती प्रॉब्लेम येतात, गुरुचरित्र वाचन करताना ७ दिवस नियम का पाळावे ? स्वयंपाक करताना स्त्रियांनी टीव्ही बघत किंवा चप्पल घालून स्वयंपाक करू नये, अशा अनेक विषयावर कुलदेवतेचे मानसन्मान, कुलदेवतेची सेवा तसेच त्या पुढे असे म्हणतात की, आपल्या या जीवनात आपण अडचणीत का येतो? याबद्दल विविध प्रश्नांची निरसन दिंडोरी दरबारात माऊलींकडून आपल्या प्रश्नांची निरसन केले जाते. त्यावर माऊली आपल्याला सेवा देतात ती आपण मनोभावेने केली तर, आपण नक्कीच आपल्या संकटातून बाहेर येतो.

आपण समाजाचे, देवाचे काही देणे लागतो म्हणून, स्वामींचीच्या दरबारात जाऊन आपली सेवा केंद्रात रुजवली पाहिजे. आपल्याला रोज नाही जमले तर आठवड्यातून, महिन्यातून एक दिवस तरी सेवा रुजू करावी . त्यांनी गर्भ संस्कार विभागापासून ते विवाह संस्कार विभागापर्यंत संपूर्ण माहिती दिली. विवाह स्थळाबद्दल सेविकाऱ्यांनी आधार कार्ड, फोटो, सर्व माहिती कम्प्युटरला द्या नंतर आपल्याला आयडी पासवर्ड दिला जातो आणि त्यानंतर आपल्याला संपूर्ण माहिती विवाह स्थळाबद्दल दिली जाते. कालच गुरुमाऊलींनी विवाह संस्कार बद्दल नवीन ॲप लॉन्च केला आहे. सध्या घटस्फोटाचे प्रमाण खूप वाढत असून, याचे कारण एकत्रित कुटुंब पद्धती राहिल्या नाही. मुलांवर संस्कार होत नाही, मुलींच्या या संस्कारा अभावामुळे घटस्फोटा पर्यंत जाऊन पुढे संबंधच तुटले जातात. अश्या अनेक विषयांवर नागरे यांनी सेवेकरांना मार्गदर्शन पर हितगुज केले.

## पेन्शन हक्कच शासनाने हिरावले !

आज निवृत्ती हक्क दिवस आहे. नोकरी करणारी व्यक्ती कधी ना कधी तरी निवृत्त होणारी असते. अनेक जण वेगळ्या वाटा धुंडाळण्यासाठी मधेच नोकरी सोडतात. मात्र, काही जणांना आयुष्याच्या संध्याकाळपर्यंतही नोकरी हवीहवीशी वाटू शकते. मात्र, आपली नोकरी संपली की अनेकांना आपले हक्क आणि अधिकार माहित नसतात. आपण जाणून घेऊयात असेच काही सरकारी निवृत्ती वेतनधारकांचे हक्क आणि अधिकार

सेवानिवृत्ती लाभांचे भाग: खरे तर निवृत्ती वेतन लाभ हे निवृत्त सरकारी अधिकाऱ्याला सतत उत्पन्न आणि सुरक्षित जीवनाची खात्री देतात. त्यामुळे निवृत्त सरकारी अधिकारी सुस्थितीत आणि आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र जगू शकतात. त्यासाठीच पेन्शनच्या तरतुदी आहेत. सेवानिवृत्तीच्या फायद्यांमध्ये मुख्यत्वे कर्मचार्यांच्या रजेचे रोखीकरण, सेवानिवृत्ती ग्रॅच्युइटी आणि त्यांच्या सेवाकाळात त्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात योगदान देत असलेल्या रकमेचा समावेश होतो. ही सर्व रक्कम एकत्र केल्यावर त्यांना चांगलाच लाभ मिळतो. ही रक्कम कर्मचार्यांच्या निवृत्त जीवनाचा आर्थिक आधार असते. त्यामुळे त्यांना इतरांवर अवलंबून राहण्याची गरज भासत नाही.

इतर फायदे: सेवानिवृत्ती लाभांव्यतिरिक्त सेवानिवृत्त सरकारी अधिकारी देखील निवृत्तीवेतन लाभांसाठी पात्र आहेत. हे फायदे त्यांना आर्थिक बाबतीत कोणत्याही अडचणींशिवाय शांततापूर्ण सेवानिवृत्त जीवन जगू देतात. सेवानिवृत्त सरकारी अधिकार्यांसाठी त्यांच्या नोकरीच्या शेवटी उपलब्ध असलेले विविध प्रकारचे निवृत्तीवेतन म्हणजे सेवानिवृत्ती, स्वेच्छानिवृत्ती निवृत्तीवेतन, अनुकंपा भत्ते, कौटुंबिक निवृत्तीवेतन, नुकसान भरपाई पेन्शन आणि असाधारण निवृत्तीवेतनाचा समावेश होतो.

निवृत्ती वेतन योजना: जे सेवानिवृत्त सरकारी अधिकारी ६० वर्षांचे होईपर्यंत सेवा करतात त्यांच्यासाठी निवृत्ती वेतन योजना लागू आहे. २० वर्षांचा कालावधी पूर्ण केल्यानंतर केवळ तीन महिन्यांनी सेवानिवृत्त होऊ इच्छिणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांना ऐच्छिक निवृत्ती वेतन दिले जाते. असाधारण निवृत्तीवेतन योजना ही आहे. यात निवृत्त सरकारी कर्मचार्यांना जे भिन्न-अपंग किंवा शारीरिकदृष्ट्या विकलांग आहेत किंवा ज्या सरकारी कर्मचार्यांच्या कुटुंबीयांना त्यांच्या

**- संकलन व सुलेखन -**
**कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.**

नोकरीच्या सेवेत आपले प्राण गमवावे लागले आहेत त्यांच्या कुटुंबांना मदत दिली जाते. कुठलाही शासकीय कर्मचारी निवृत्त होतो, तेव्हा त्याला निवृत्तीवेतन दिले जाते. ते त्याच्या मृत्यूपर्यंत सुरू राहते. मृत्यूपश्चात या निवृत्तीवेतनाचा काही हिस्सा त्या कर्मचाऱ्याच्या पत्नीलाही मिळतो. काही प्रसंगात, या कर्मचाऱ्याच्या अपत्याला अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्याचीही तरतूद शासनात आहे. पण या निवृत्ती वेतनाचेही अनेक प्रकार असतात.

**निवृत्ती वेतनाचे प्रकार:** निवृत्तीवेतनाचे ८ प्रकार आहेत- १) नियत वयोमान निवृत्तीवेतन, २) पूर्णसेवा निवृत्तीवेतन, ३) रुग्णता निवृत्तीवेतन, ४) भरपाई निवृत्तीवेतन, ५) जखम किंवा इजा निवृत्तीवेतन, ६) अनुकंपा निवृत्तीवेतन, ७) कुटूंब निवृत्तीवेतन आणि ८) असाधारण कुटूंब निवृत्तीवेतन. नियत वयोमानानुसार म्हणजे वयाची ५८ वर्षे पूर्ण झाल्यावर व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यावर कर्मचारी निवृत्त होतो. स्वेच्छानिवृत्ती, रूग्णता आणि भरपाई हेही निवृत्तीचे प्रकार आहेत. अकार्यक्षमतेमुळे देण्यात येणारी निवृत्ती म्हणजे अनुकंपा निवृत्ती होय. निवृत्ती वेतन घेणारा जेव्हा मरण पावतो तेव्हा त्याच्या कुटुंबाला मिळते ते कुटूंब निवृत्ती वेतन होय. एखादा सरकारी कर्मचारी हरवल्यास त्याच्या कुटुंबाला त्रास होवू नये म्हणून असाधारण कुटूंब निवृत्ती वेतन देतात.

निवृत्ती वेतन कोणाला मिळते?: सेवानिवृत्ती वेतनासाठी कमीत कमी १० वर्षे कालावधी हिशेबात घेतला जातो. आता १० वर्षे सेवा झाल्यानंतर शेवटच्या वेतनावर पूर्ण निवृत्ती वेतन दिले जाते. ज्या कर्मचाऱ्यांची अर्हताकारी सेवा १० वर्षांपेक्षा कमी आहे त्यांना निवृत्तीवेतनाऐवजी सेवा उपदान दिले जाते. निवृत्ती वेतनाची मोजणी ही निवृत्तीपूर्वी शेवटच्या १० महिन्यांत घेतलेल्या वेतनाच्या सरासरीवर किंवा कर्मचारी ज्या पदावरून सेवानिवृत्त झाला आहे, त्या पदाकरिता निश्चित करण्यात आलेल्या मूळ वेतनाच्या ५०% दराने यापैकी जे फायदेशीर असेल ते निवृत्ती वेतन देय असते.

कुटूंब निवृत्तीवेतन म्हणजे काय?: कुटूंब निवृत्तीवेतनाचेही दोन प्रकार आहेत. त्यात कर्मचाऱ्याचा सेवेत मृत्यू झाल्यास आणि निवृत्तीवेतन धारकाचा मृत्यू झाल्यानंतर. कुटूंब निवृत्तीवेतन हे कर्मचाऱ्याच्या पत्नी किंवा पतीस मिळते. एक वर्ष सेवा झाल्यानंतर सेवेत कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटूंबियांना कुटूंब निवृत्ती वेतन देय होते. एक वर्ष सलग सेवा होण्यापुर्वी मृत्यू झाला असेल व अशा कर्मचाऱ्याची सेवेत नेमणूक होण्यापूर्वी वैद्यकीय तपासणी झाली असेल, तर त्यांच्या कुटूंबीयांना कुटूंब निवृत्ती वेतन मिळते.

खासगी आस्थापनांचे नियम वेगळे: आपण निवृत्ती वेतनधारकांचे हक्क आणि अधिकार पाहिले. मात्र, खासगी आस्थापनांमध्ये नियम वेगळे आहेत. तिथे बहुतांश जणांना निवृत्ती वेतन मिळत नाही. खासगी ठिकाणी आपले नियमित वेतन, भविष्य निर्वाह निधी आणि ग्रॅच्युईटीच्या नियम ात सदर कर्मचारी बसत असेल, तर ते नियानुसार मिळते. अनेक ठिकाणी शिल्लक सुट्ट्यांचे पैसे किती मिळणार याचेही वेगवेगळे नियम आहेत. कंपनीनुसार या नियमात बदल होतो. सद्या बहुतांश ठिकाणी कंत्राटी पद्धतीवर भरती असते. त्यामुळे या वर्गाला म्हणावा तितका लाभ निवृत्तीनंतर मिळताना दिसत नाही. आता तर खाजगी काय नि सरकारी काय? सगळे काही सब घोडे बारा टक्के करण्यात आले, हेच मोठे क्लेशदायी ठरले आहे.

**|| राष्ट्रीय वेतन हक्क दिनाच्या सर्व शासकीय कर्मचार्यांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी ||**